





**जाहिरात दरपत्रक**

| | |
|---|---|
| मलपृष्ठ | ३०,०००/- |
| कव्हर आतील बाजू २ | २२,०००/- |
| पान ३ | १५,०००/- |
| पान नं.४,५,६ | १०,०००/- |
| रंगीत पूर्ण पान | ६,०००/- |
| रंगीत अर्धे पान | ४,०००/- |
| कृष्ण-धवल पूर्ण पान | ४,०००/- |
| कृष्ण-धवल पाव पान | १,५००/- |
| शुभेच्छा | ५००/- |

अंक आकार : ११ X २५ सेमी, कव्हर लॅमिनेशनसह, प्रति १०,०००, सर्व जाहिरातदारांना पाक्षिक 'स्वाभिमानी विचार' एक वर्ष मोफत.

सुचना : १. जाहिरात व साहित्य पाठविण्याची अंतिम तारीख ५ ऑक्टोबर २०११ असेल.
२. आपला धनादेश अथवा डी.डी. 'स्वाभिमानी विचार' या नावानेच काढावा.

'स्वाभिमानी विचार' हे स्वाभिमानी प्रतिष्ठानतर्फे चालविले जाणारे पाक्षिक गेली चार वर्षे सातत्याने शेतकऱ्यांचे आंदोलन, समाजातील दीनदुबळ्यांचे, शोषितांचे प्रश्न आणि प्रस्थापित राजकारण्यांची दंडेलशाही याविषयी वेगळी भूमिका घेऊन संघर्ष करत आहे. खासदार राजू शेट्टी संपादक असलेल्या या पाक्षिकाने आजवर महापूर, आत्महत्या, दूध, शेतकरी चळवळ, शिक्षण व आरोग्य या विषयांवर सखोल चर्चा असलेले दर्जेदार नि संग्राह्य दिवाळी अंक प्रसिद्ध करून दिवाळी अंकानध्ये वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळविले आहे. अनेक पारितोषिकेही मिळविली.

यंदाचा स्वाभिमानी विचार दिवाळी २०११ हा विशेषांक **'भ्रष्टाचार निर्मुलन एक आव्हान'** या विषयावर काढण्याचे ठरविले आहे. तरी आपल्या संस्थेची जाहिरात आमच्या दिवाळी अंकास देऊन आपला व्यवसाय वृद्धींगत करावा, हि नम्र विनंती

आपला जाहिरात व्यवस्थापक **स्वाभिमानी विचार**

स्वाभिमानी विचार

Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213

Rgd. No.2/17/RNP/ K.L.P/234/09-11

वर्ष ६ | अंक २१ | १ ऑक्टोबर २०११ | किंमत ५ रुपये | पाने २०

# स्वाभिमानी विचार

RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11

संपादक : खासदार राजू शेट्टी

शेतकरी संघटना



## 'स्वाभिमानी'चा आसूड फिरला

पुणे : उसाचा पहिला हप्ता विनाकपात २३५० रुपये मिळावा, या प्रमुख मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने पुण्यात साखर आयुक्तालयावर सोमवारी (ता. १९) 'आसूड मोर्चा' काढण्यात आला. खा. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली या मोर्चाची सुरुवात महात्मा फुले वाड्यातून झाली.

बातमी पान ४ वर



# राज्यसरकारचा उसाच्या पैशावर डल्ला

संपादकीय

खासदार राजू शेट्टी
rajushetti@gmail.com

राज्य सरकारने आगामी जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. या निवडणुकांमध्ये शेतकऱ्यांच्या पैशाची उधळपट्टी करण्यासाठीच राज्यसरकारने उसाला १३७५ रुपये भाव देऊन राहिलेला पैसा साठवून ठेवला आहे.

उसाला मागील वर्षीचा पहिला हप्ता २००० रुपये होता. तर आता १३७५ जाहीर केला आहे. म्हणजेच राज्यातील दोन कोटी टन उसाचे उत्पन्न गुणिले सा–तशे रुपये केले तर कारखानदार व राज्य सरकार ५ हजार ६०० कोटी रुपयांचा दरोडा शेतकऱ्यांवर टाकणार आहेत. पोलिसांच्या अहवालानुसार एका संपूर्ण वर्षात महाराष्ट्रात टाकलेल्या जनसामान्य घरातल्या दरोड्यातली रक्कम ही ३२ कोटींच्या वर गेलेली नाही.

साखर कारखाने कवडी मोलाने विकून कामगार, शेतकरी यांना देशोधडीला लावलं. ४० हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बिलातून केलेली कपात ही बेकायदा असल्याचे ताशेरे कॅगने शासनावर ओढले आहेत. यामध्ये प्रत्येक साखर कारखान्याकडे शेतकऱ्यांचे १३५ कोटी रुपये येणे आहेत. राज्यात एकूण २०२ साखर कारखाने याप्रमाणे २८ ते ३० हजार कोटी रुपये देणी लागतात. हा सगळा पैसा साखर सम्राटांनी आपल्या घशात घातला आहे. साखर आयुक्तांनीही केवळ दिखाऊ भूमिका घेऊन त्यांचीच रि ओढण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचा दाम मिळणे आता दुरापास्त झाले आहे. येत्या हंगामात एक मागील वर्षापेक्षा एक पैसाही कमी घेतला जाणार नाही. याची जाणीव साखर सम्राटांनी व त्यांच्या डोक्यावर हात ठेवणाऱ्या शासनाने ध्यानात ठेवावी

शेतकरी संघटना स्वाभिमानी

◆ वर्ष ६ ◆ अंक २१ ◆१ ऑक्टोबर २०११ ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com ◆ **कार्यकारी संपादक : डॉ. महावीर अक्कोळे** ◆ **सह संपादक : डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार** ◆ **निवासी संपादक : सदाभाऊ खोत** ◆**मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे** राळेगणसिद्धी, **न्या. पी. बी. सावंत** पुणे, **न्या.बी.जी.कोळसे पाटील** पुणे, . **प्रा. शरद पाटील** सांगली, **कुमार सप्तर्षी** पुणे, **माजी आमदार. वामनराव चटप** चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी ◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर–४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर–४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी रु. १००/-

# उत्पादन वाढल्याने टोमॅटोला मोठा फटका

सांगली : लालबुंद टोमॅटो बाजारात घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा रंग उडला आहे. यंदा जवळपास दुपटीने उत्पादन येऊनही हंगाम संपताना उत्पन्नात घाटाच दिसू लागला आहे. बाजारात जिकडे-तिकडे टोमॅटोच दिसू लागल्यामुळे गेले दोन महिने दर गडगडला होता, तो अजूनही कायम आहे. सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांसह दिल्ली, कोलकता आणि अहमदाबाद बाजारपेठेसाठी अवघा दोन ते तीन रुपये किलोने तो विकावा लागला. त्यामुळे शेतकऱ्यांना एकरी दहा हजारांहून अधिक फ टका सहन करावा लागला आहे.

स्थानिक बाजारात वांगी, दोडका, कारले, ढबू आणि अन्य भाजीपाल्याचा दर तीस ते चाळीस रुपये किलोच्या घरात आहे. त्या तुलनेत टोमॅटो दराचा पुरता चिखल झाला आहे. सांगली आणि विशेषतः कोल्हापूर जिल्ह्यात यावर्षी इतका टोमॅटो पिकलाय की तो खपवायचा कुठे, हा प्रश्न पडल्याचे भाजीपाला संघवाले सांगत आहेत. मे-जूनमध्ये अवकाळी पाऊस झाला नाही, पीक भरात असताना पावसाने उघडीप दिल्याने नुकसान टळले आणि ढगाळ वातावरण नसल्याने रोग आला नाही. टोमॅटो पिकासाठी ही आदर्श परिस्थिती राहिली. एकरी सहाशे पेटी निघणारे उत्पन्न एक हजार पेटीवर पोहोचले; मात्र फ ायदा म्हणून दमडीही राहिली नाही, असे शेतकरी सांगतात.

सांगली जिल्ह्यात दुधगाव, अंकलखोप, आष्टा, कवठेपिरान, तुंग आदी पट्ट्यात काही प्रमाणात टोमॅटोचे उत्पादन घेतले जाते. शिरोळ तालुक्यातील दानोळी, कोथळी, उमळवाड इथे मोठ्या प्रमाणात टोमॅटो पिकतो. तो स्थानिक आणि दिल्ली, कोलकता, अहमदाबाद बाजारात पाठविला जातो. इथे दलाल थेट खरेदी करून पाठवितात. तिथल्या दराचा अंदाज घेऊनच सौदा होतो. यंदा महाराष्ट्रासह कर्नाटकात टोमॅटोचे पीक भरघोस आल्याने दर गडगडला. तो पुन्हा सावरलाच नाही.

दानोळी येथील रवींद्र शिंत्रे म्हणाले, ''टोमॅटोने यंदा झटका दिला. पीक चांगले आल्याचा आनंद होण्यापेक्षा दर पडल्याचे दुःख मोठे आहे. कधी दोन, कधी चार रुपये किलो दराने तो विकताना वाईट वाटते. पिकाचा एकरी सत्तर हजार रुपये खर्च आला. सरासरी साठ रुपये पेटीने विक्री होतेय. हातात पन्नास हजार पडतात. एकरी दहा हजारांचा घाटा सहन करावा लागतो. आम्ही दिल्ली, अहमदाबादला टोमॅटो पाठवतो. तिकडेसुद्धा तीच अवस्था आहे.''











# आसुडापुढे सरकार नमले

## ऊसदरासाठीचे 'स्वाभिमानी'चे आंदोलन आश्वासनानंतर स्थगित

पुणे : ऊसदरासह विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या हजारो कार्यकर्त्यांनी सोमवारी साखर संकुलाला तब्बल नऊ तास घेराओ घालून साखर आयुक्तांसह सुमारे दीडशे अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोंडून ठेवले. अखेर चर्चेच्या फेऱ्यानंतर पुढील आठवड्यात मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन मार्ग काढला जाईल, असे आश्वासन सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी दिल्याचे पत्र साखर आयुक्तांनी दिले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा खासदार राजू शेट्टी यांनी रात्री पावणेअकराच्या सुमारास केली. खासदार शेट्टी यांच्या नेतृत्वाखालील आज सकाळी महात्मा फुले वाड्यापासून पान ५ वर ▶


**श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर**

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

**श्री. व्ही. बी. हुग्गे.**
बी. ए. बी. कॉम.
चिफ एक्झि ऑफिसर

**श्री. अशोक शां रूणवाळ.**
बी. कॉम
व्हा. चेअरमन
व सर्व संचालक

**पै. विठ्ठल बाबूराव मोरे**
एम. ए.
चेअरमन



# आसुडापुढे सरकार नमले

▶ पान ४ वरून

निघालेल्या आसूड मोर्चाने अखेर सरकारला नमते घ्यावे लागले.

ऊसउत्पादकांच्या सर्व मागण्यांवर सहकारमंत्र्यांशी फोनवर चर्चा झाली आहे. तसे पत्र साखर आयुक्त विजय सिंघल यांनी दिल्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे; पण पुढील बैठकीत निर्णय न झाल्यास उग्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शेट्टी यांनी दिला.

खासदार शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (ता. १९) सकाळी महात्मा फुले वाड्यापासून निघालेला आसूड मोर्चा शनिवारवाडा मार्गे दुपारी दोनच्या सुमारास साखर संकुल येथे धडकला. या मोर्चात पुणे, नगर, कोल्हापूर, सांगली, साताऱ्यासह राज्यातील सुमारे १५ हजार ऊसउत्पादक शेतकरी सहभागी झाले होते. येत्या हंगामात उसाला प्रतिटन पहिली उचल किमान २३५० रुपये द्यावी, ऊसबिलातून कोणतीही कपात करू नये, तसेच अन्य मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असा कडक पवित्रा घेत आंदोलकांनी साखर संकुलाला घेराव घातला. त्यामुळे साखर आयुक्तांसह, कृषी, जिल्हा उपनिबंधक तसेच अन्य शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना कार्यालयातच अडकून पडावे लागले.

दुपारी झालेल्या सभेत बोलताना राजू शेट्टी म्हणाले, ''राज्य सरकारने गेल्या हंगामात उसाला पहिली उचल प्रतिटन दोन हजार रुपये देण्याचा निर्णय घेऊनही अध्यादेश जारी न

पान ६ वर ▶






# आसुडापुढे सरकार नमले

▶ पान ५ वरून

केल्याने ऊस उत्पादकांची फसवणूक झाली. यंदा उसाला पहिली उचल २३५० रुपये आणि मागील हंगामात गाळप झालेल्या उसाचे अंतिम बिल २७०० रुपये देण्यात यावे, साखर कारखान्यांकडून त्यांच्या संस्थांसाठी उसाच्या बिलातून परस्पर रकमा कपात करण्यात येऊ नयेत, कारखान्यांकडून वजनकाट्यात ऊस उत्पादकांची फसवणूक केली जात आहे, त्यामुळे वजनकाटे ऑनलाइन करण्यात यावेत.''

याच दरम्यान स्वाभिमानी संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत, माजी आमदार बाबूराव पाचर्णे, जालंदर पाटील, भगवान काटे, जयवंत बगाडे, रणधीर नाईक, सतीश काकडे, एल. आर. पाटील, अण्णासाहेब चौगुले यांच्या शिष्टमंडळाने साखर आयुक्त सिंघल यांची भेट घेऊन निवेदन दिले. मात्र, सुमारे दोन तास चाललेल्या खडाजंगी चर्चेत साखर आयुक्तांनी कोणतेही ठोस आश्वासन दिले नाही. आयुक्त सिंघल म्हणाले, ''याबाबत सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीत नुकत्याच झालेल्या बैठकीत चर्चा करून लवकरच मार्ग काढण्याचे आश्वासन दिले आहे. आंदोलनकर्त्यांच्या भावना सरकारपर्यंत पोचविण्यात येतील.'' या आंदोलनात मावळच्या आंदोलनात मृत्यमुखी पडलेल्या

पान ७ वर ▶

### तासगाव कारखाना चालविण्यास द्या

शेतकरी संघटनेने एखाद्या साखर कारखाना चालवून दाखवावा, असे आव्हान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतेच दिले होते. त्यामुळे आता त्यांनी तासगाव येथील साखर कारखाना संघटनेला चालविण्यास द्यावा. ठरलेल्या किमतीपेक्षा एक कोटी रुपये जादा देऊन शेतकरी कारखाना चालवून दाखवतील, असा ठराव या वेळी संमत करण्यात आला. हिंमत असेल तर पवार यांनी हा कारखाना चालविण्यास द्यावा, असे आव्हान राजू शेट्टी यांनी दिले. तसेच, राज्य सहकारी बँकेच्या व्यवहाराची 'सीबीआय'मार्फत चौकशी करण्याची मागणी केली.

# गेल्या वर्षीपेक्षा पै कमी घेणार नाही

**गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा प्रतिकूल परिस्थिती असल्याने ऊस उत्पादनात घट होणार आहे. तरीही सरकार मात्र जादा ऊस क्षेत्राचा आभास निर्माण करते आहे. ऊस दर पाडण्याच्या कटात सरकारच सहभागी होतेय, हा संतापजनक प्रकार आहे. गेल्या वर्षीपेक्षा एक पैही कमी घेणार नाही. सरकारने त्यांच्या पहिल्या हप्त्याचा प्रस्ताव द्यावा. त्यावर चर्चा करून आम्ही योग्य तो निर्णय घेऊ.**

**राजू शेट्टी,**
**खासदार, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

साखरेच्या वर्षभरातील किमतीवर उसाचा पहिला हप्ता ठरतो. राज्य बँक कारखान्याला साखरेच्या किमतीच्या ८० ते ८५ टक्क्यांपर्यंत कर्ज देते. त्यातून पहिला हप्ता दिला जातो. गेल्या वर्षभरात साखरेचा भाव क्विंटलला कमीत कमी २३००, तर जास्तीत जास्त २९०० रुपये इतका मिळाला. गेल्या वर्षी पहिला हप्ता दोन हजार रुपयांच्या आसपास मिळाला, तर दोन वर्षांपूर्वी २२०० ते २३०० रुपयांपर्यंत पहिला हप्ता मिळाला. गेल्या तीन वर्षांत साखरेचा दर २३०० च्या खाली गेला नाही. यामुळे यंदाही नि:संकोचपणे गेल्या वर्षीपेक्षा जास्त दर मिळालाच पाहिजे. त्यामुळे गेल्या वर्षीपेक्षा कमी दर देण्याचा प्रयत्न कदापि खपवून घेतला जाणार नाही. एफ आरपीनुसार दर द्यावा, अशी सरकारची शिफारस असली तरी एफ आरपीचा मूलाधारच चुकीचा आहे. कमी मजुरी खर्च दाखवून शेतकऱ्यांना लुटण्याचा डाव सुरू आहे. एफ आरपीनुसार १३७५ रुपये देणे म्हणजे शेतकऱ्यांची फसवणूकच ठरेल. उर्वरित रक्कम ही कारखानदारांच्या घशातच जाईल. यंदाची स्थिती वेगळी आहे. यंदा वेळेत पाऊस झाला नाही. उसाची अपेक्षित वाढ नाही. साहजिकच सरासरी एकरी उत्पन्न घटेल. गेल्या वर्षी फयान वादळामुळे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये पाऊस झाला. यामुळे उसाला पूरक स्थिती होती. त्यामुळे उत्पादन वाढले. पण गेल्या वर्षीइतकीच परिस्थिती असल्याचा आभास निर्माण केला जातोय. ऊसउत्पादक सैरभैर व्हावा आणि त्याने दराचा विचार न करता ऊस कारखान्याला घालावा, असा कुटिल डाव आहे.

कारखानदारांना शिस्त लावण्याची भाषा करणाऱ्या राज्य बँकेला माझा प्रश्न आहे, की दीड-दोनशे कोटींच्या कर्जाचा बोजा असणारे राज्यातील सुमारे सोळा साखर कारखाने केवळ पंधरा-वीस कोटीत विकण्यात आले. त्यातील दोषी संचालकांच्या मालमत्तांवर टाच का आणली नाही, याचे स्पष्टीकरण बँकेच्या प्रशासकांनी द्यावे. आगामी काळात नगरपरिषदांच्या निवडणुका होत आहेत. साखर कारखानदारांना त्या त्या विभागाची जबाबदारी देऊन निवडणुकीचा खर्च करण्यास लावण्याचा कुटिल डाव सुरू आहे. आम्ही ते सहन करणार नाही. प्रतिवर्षीप्रमाणे जयसिंगपुरात मेळाव्यात आमच्या हक्काची मागणी करू.


## शेतकऱ्यांनो हक्कासाठी एकत्र या

नेसरी : आपल्या हक्कांसाठी शेतकऱ्यांनो संघटित व्हा, असे आवाहन खासदार राजू शेट्टी यांनी येथील सभेत केले. संघटित बळावरच आपले प्रश्न सुटणार आहेत. शेतकरी संघटना आपल्या प्रश्नांसाठी सातत्याने शासनाशी झगडत आहे. न्याय मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा दिलासाही त्यांनी यावेळी दिला. साखरे मंगल कार्यालयात मेळावा झाला. प्रमुख पदाधिकारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार शेट्टी म्हणाले, 'साखर उद्योगाला शिस्त लावण्याची भाषा शासन करत आहे; परंतु प्रत्यक्षात कार्यवाहीमध्ये मात्र वरवरची उपाययोजना आहे. मुळापासून शिस्त लावण्याची गरज आहे. ती हिम्मत शासनात दिसत नाही. शेतकऱ्यांची मात्र लुबाडणूक सुरू आहे. त्या विरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटना विविध स्तरांवर शासनाशी झगडत आहे. आंदोलन जाहीर झाल्यानंतर शासन आता वाटाघाटीची भाषा करीत आहे. परंतु प्रथम मोर्चा आणि नंतर चर्चा हे आम्ही शासनाला स्पष्ट केले आहे. उसाचे अर्थशास्त्र शासनाला आम्ही दिले आहे. ऊस उत्पादकाला योग्य भाव मिळाल्याशिवाय साखर कारखाने सुरू होऊ देणार नाही ही आमची भूमिका ठाम आहे.

सभेत जालंदर पाटील, भगवान काटे, नितीन पाटील, अण्णा कोकितकर, प्रशांत पाटील, सुरेश कुट्रे यांची भाषणे झाली.

## श्रीकांत भेंडवडे यांचे निधन



कवठेगुलंद : येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्रीकांत शंकर भेंडवडे यांचे नुकतेच निधन झाले. संघटनेच्या कार्यात ते सक्रिय होते. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सुन, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे.

# ऊस उत्पादकांच्या ६४ हजार कोटींवर दरोडा

## राजू शेट्टी : दर कमी देऊन साखर सम्राटांचे निवडणुकांसाठी कटकारस्थान



शिराळा : पुणे येथे सोमवारी होणाऱ्या आसूड आंदोलनानिमित्त येथे रविवारी झालेल्या बैठकीत खासदार राजू शेट्टी यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी रणधीर नाईक उपस्थित होते.

शिराळा : ऊस दर कमी देऊन पालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी साखर सम्राट शेतकऱ्यांच्या ६४ हजार कोटींवर दरोडा टाकण्याच्या तयारी आहेत. तो डाव उधळून लावण्यासाठी शेतकऱ्यांनी एकीने पुणे येथे उद्या (ता. १९) होणाऱ्या आसूड आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन खासदार राजू शेट्टी यांनी आज येथे केले.

आंदोलनासाठी वारणा-मोरणा संघाच्या सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. युवा नेते रणधीर नाईक अध्यस्थानी होते. श्री. शेट्टी म्हणाले, ''गेल्या वर्षाएवढाच यंदा साखरेचा दर आहे; मग उसाला १३७५ दर का? गेल्या वर्षापेक्षा कमी दर देऊन राहिलेले पैसे आगामी पालिका व जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांवर खर्च केले जाणार आहेत. निवडणुकीच्या खर्चाचे टार्गेट साखर कारखानदारांना दिले जाणार आहे. राज्य बँकेला पुढे करून शेतकऱ्यांना लुटण्याचा प्रयत्न केला जात आहे. गतवर्षापेक्षा ७०० ते ८०० रुपये दर कमी असे गृहीत धरले तर राज्यातील एकूण शेतकऱ्यांच्या ६४ हजार कोटींवर दरोडा साखर सम्राट टाकणार आहेत. शेतकऱ्यांच्या जीवावर कारखानदार वाढले आहेत. आता त्यांना दुरुस्त करावयाचे असेल तर त्यांच्याकडील जादा पैसा काढला पाहिजे.''

ते म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या उसाला योग्य दर मिळालाच पाहिजे. बिलातून इंडोमेंट ट्रस्ट, रस्ते आणि वेगवेगळ्या मार्गांनी होणारी कपात रद्द करण्याचा अध्यादेश साखर आयुक्तांनी काढावा, अशी मागणीही आंदोलनाद्वारे करणार आहोत. अशा कपातीद्वारे लाखोंचा घोटाळा होत आहे. त्यास कॅगने दरोडीखोरी म्हटले आहे. या दरोडीखोरीला विरोध आहे. साखर सम्राटांना समाज सेवा करावयाची असेल तर त्यांनी पावती पुस्तके छापून गावोगावी फिरून वर्गणी गोळा करावी. आता मागण्यांसाठी शासनाला नमवले पाहिजे. ती ताकद शेतकऱ्यांच्या एकजुटीत आहे.''

श्री. नाईक म्हणाले, ''सामान्यांच्या जीवनाबाबत शासन संवेदनशील नाही. ऊस दराबाबत शासनाला धडा शिकवण्यासाठी सर्वांनी आंदोलनात सहभागी व्हावे. आपला लढा कोणा एका व्यक्तीशी नाही तर तो कारखानदारीच्या व्यवस्थेशी आहे.''

विकास देशमुख, रवी दुकाने, एस. के. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सत्यजित नाईक, अशोकराव पाटील, जयसिंगराव शिंदे, विश्वास कदम, बंडा डांगे, बाबाराम कांबळे, के. डी. पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष विकासराव देशमुख, राम पाटील, भगवान मस्के, के. वाय. भाष्टे, एन. डी. लोहार उपस्थित होते.

# सरकारचा उसाच्या पैशावर डल्ला

## खासदार शेट्टी : आगामी निवडणुकीत उधळपट्टीचा डाव

नेर्ले : राज्य सरकारने आगामी जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. या निवडणुकांमध्ये शेतकऱ्यांच्या पैशाची उधळपट्टी करण्यासाठीच राज्य सरकारने उसाला १३७५ रुपये भाव देऊन राहिलेला पैसा साठवून असल्याचा आरोप खासदार राजू शेट्टी यांनी केला. नेर्ले येथे ऊस दरासंदर्भात पुणे येथे आयोजित आसूड मोर्चा निमित्त आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक प्रमुख उपस्थित होते.

खासदार शेट्टी म्हणाले, ''उसाला मागील वर्षीचा पहिला हप्ता २००० रुपये होता. तर आता १३७५ जाहीर केला आहे. म्हणजेच राज्यातील दोन कोटी टन उसाचे उत्पन्न गुणिले सातशे रुपये केले तर कारखानदार व राज्य सरकार ५ हजार ६०० कोटी रुपयांचा दरोडा शेतकऱ्यांवर टाकणार आहेत. पोलिसांच्या अहवालानुसार एका संपूर्ण वर्षात महाराष्ट्रात टाकलेल्या जनसामान्य घरातल्या दरोड्यातली रक्कम ही ३२ कोटींच्या वर गेलेली नाही. म्हणजेच हे किती मोठे दरोडेखोर आहेत याचा आपण विचार करा.

साखर कारखाने कवडी मोलाने विकून कामगार, शेतकरी यांना देशोधडीला लावलं. ४० हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बिलातून केलेली कपात ही बेकायदा असल्याचे ताशेरे कॅगने शासनावर ओढले आहेत. येत्या १९ तारखेला पुणे येथे फुलेंच्या वाड्यापासून ते साखर आयुक्त कार्यालयापर्यंत आसूड मोर्चासाठी येताना वादीचा चाबूक खांद्यावर टाकून मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.'' शिवाजीराव नाईक यांनी शासनाचे प्रतिनिधी शासनाचे नाक दाबून तोंड

# यंदाच्या ऊस हप्त्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष

## महाराष्ट्रात ३३०० ची मागणी : हिरा शुगरचा गळीत हंगाम पुढील महिन्यात

संकेश्वर : ऑक्टोबरमध्ये हिरा शुगरचा २०११-१२ चा गळीत हंगाम सुरू होणार असून, या उसावर पहिला हप्ता (उचल) किती मिळणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष वेधले आहे. महाराष्ट्रात खासदार राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आतापासूनच आक्रमक धोरण स्वीकारून, वाजवी ऊस दराच्या मागणीसाठी आंदोलन पुकारले आहे. प्रति टन उसावर किमान २००० रुपयांची उचल व अंतिम दर ३३०० रुपये मिळावा, अशी त्यांची मागणी आहे. याशिवाय २००० रुपयांच्या पहिल्या हप्त्यामध्ये एक दमडीही कमी उचल स्वीकारणार नाही, अशी गर्जना त्यांनी केली आहे. या उलट बेळगाव जिल्ह्यासह कर्नाटक राज्यात रयत संघटनेचा प्रभाव व दबाव कमी असल्यामुळे महाराष्ट्राप्रमाणे कर्नाटकातील साखर कारखान्याकडून ऊस दराची उचल मिळणार का? याबद्दलचा संशय व संभ्रम कायम टिकून आहे. किंबहुना कर्नाटक राज्याच्या तुलनेत सर्वाधिक म्हणजे २० साखर कारखाने बेळगाव जिल्ह्यात कार्यरत असून, उसाचे निम्मे क्षेत्र एकट्या बेळगाव जिल्ह्यात आहे, त्यामुळे ऊस दराचा प्रश्न नेहमीच ऐरणीवर व शेतकऱ्यांच्यादृष्टीने जिव्हाळ्याचा ठरला आहे.

बेळगाव जिल्ह्यात यंदा गळीत हंगामासाठी १.९२ लाख हेक्टर उसाचे क्षेत्र उपलब्ध आहे. आगामी सन २०११-१२ च्या गळीत हंगामासाठी शिवशक्ती (ता. रायबाग) व शिवसागर (ता. रामदुर्ग) या दोन खासगी क्षेत्रांतील कारखान्यांची भर पडणार आहे. त्यानुसार जिल्ह्यात सात सहकारी व तेरा खासगी साखर कारखाने ऊस गळितासाठी सज्ज झाले आहेत. दरम्यान केंद्र सरकारने नऊ टक्के साखर उताऱ्याच्या उसासाठी प्रति टनास १३७५ रुपये आधारभूत दर जाहीर केला आहे. या कमी दरामुळे ऊस उत्पादनाचा वाढीव खर्चसुद्धा शेतकऱ्यांच्या पदरात पडणार नाही. या पार्श्वभूमीवर वाजवी ऊस दराच्या निश्चितीबद्दल केंद्र सरकार साखर उद्योजक व ऊस उत्पादक यांच्यात मतैक्य होणे कठीण आहे.

# थकबाकीदार कृषिपंपधारकांवर कारवाईची वीज कोसळणार

## वीजपुरवठा तोडण्याची मोहीम १ ऑक्टोबरपासून सुरू

मुंबई : महावितरणने उघडलेल्या मोहिमेत आतापर्यंत घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. आता थकबाकीदार शेतकऱ्यांची वीज तोडण्याची मोहीम १ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे.

कृषी संजीवनी योजनेद्वारे थकबाकीदार शेतकऱ्यांना दिलासा मिळाला होता; मात्र आता त्यांच्यावरही महावितरण कारवाई करणार आहे. महावितरणने १२ सप्टेंबरला सुरू केलेल्या मोहिमेत आतापर्यंत ४ लाख थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित केला आहे. कृषी संजीवनीमुळे आतापर्यंत थकबाकीदार कृषिपंपधारकांवर कारवाई करता येत नव्हती. मात्र, या ग्राहकांची थकबाकी आता ६६०० कोटी रुपयांवर गेल्यामुळे महावितरण १ ऑक्टोबरपासून त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्याचा धडाका सुरू करेल.

एकीकडे वीजभारनियमन टाळण्यासाठी राज्याबाहेरील स्रोतांकडून महागड्या दराने वीजखरेदी केली जाते; तर दुसरीकडे महावितरणच्या ग्राहकांकडील वीजदेयकांची थकबाकी शेकडो कोटी रुपयांवर गेली आहे. सध्या पुरेशी वीज उपलब्ध असली, तरी वाणिज्यिक हानी कमी होत नसल्याने महावितरण अडचणीत आल्याचे सांगितले जाते.

### 'कृषी संजीवनी' बासनात?

महावितरणचे २७ लाख कृषिपंपधारक वीजग्राहक आहेत. कृषिपंपधारक ग्राहकांसाठी राज्य सरकारचे कृषी खाते आणि महावितरण यांच्या संयुक्त प्रयत्नांमधून मार्चमध्ये अर्थसंकल्पात कृषी संजीवनी योजना जाहीर करण्यात आली. थकीत वीजदेयकांतील केवळ मुद्दल भरण्याची मुभा या ग्राहकांना देण्यात आली होती; त्यांच्याकडून व्याज आणि दंडाची रक्कम घेतली जात नव्हती. मात्र, या योजनेला अत्यल्प प्रतिसाद मिळाला. या संधीकडे थकबाकीदार शेतकऱ्यांनी कानाडोळा केल्याने डिसेंबरअखेरपर्यंत असणारी ही योजना ऑक्टोबरमध्येच गुंडाळली जाणार असल्याचे समजते.

# ऊसदरावर तोडगा निघण्याची शक्यता कमी!

## पहिल्या उचलीबाबत खासदार शेट्टी ठाम

पुणे, ता. १५ : मागील हंगामाच्या तुलनेत यंदा उसाची पहिली उचल एक रुपयाही कमी घेणार नसल्याच्या निर्णयावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी ठाम आहेत. शेतकरी संघटनांच्या या भूमिकेमुळे ऊसदराचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता कमीच आहे.

येत्या एक ऑक्टोबर रोजी गाळप हंगाम सुरू होणार आहे; परंतु यंदा उसाला पहिली उचल किती असावी, याबाबत साखर कारखाने आणि शेतकरी संघटना यांच्यात मतभेद आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी पुण्यात शुक्रवारी बैठक बोलावली आहे. सहकार राज्यमंत्री प्रकाश सोळंके, सचिव राजगोपाल देवरा, साखर आयुक्त विजय सिंघल, तसेच राज्य सहकारी बॅंक आणि राज्य साखर संघाचे पदाधिकारी या वेळी उपस्थित राहणार आहेत.

मंत्री समितीच्या बैठकीत उसाला एफ आरपीपेक्षा (किफ ायतशीर व वाजवी दर) कमी दर देऊ नये, असा निर्णय नुकताच घेण्यात आला. तर, राज्य सहकारी बॅंकेने एफ आरपीपेक्षा जादा दर देऊ नये, असे साखर कारखान्यांना बजावले आहे. याबाबत शेतकरी संघटनेने आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून साखर आयुक्तालयातील अधिकाऱ्यांची धावपळ सुरू आहे.

यंदा उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे उसाला पहिली उचल प्रतिटन २२०० रुपये आणि स्वामिनाथन समितीच्या शिफ ारशीनुसार ५० टक्के नफ ा, यानुसार प्रतिटन ३३०० रुपये अंतिम दर द्यावा. तसेच, गेल्या हंगामात राज्य सरकारने कोल्हापूर विभागात प्रतिटन उसाला पहिली उचल दोन हजार रुपये, पुणे विभागात १८०० रुपये; तसेच मराठवाड्यात १७५० रुपये देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, अद्याप अध्यादेश जारी केलेला नाही. सरकारने शेतकऱ्यांची फ सवणूक केल्यामुळे पुन्हा चर्चेसाठी जाणार नसल्याचे रघुनाथदादा पाटील यांनी सांगितले.

यंदा उसाला एकही रुपया कमी घेणार नाही. शिवाय ऊसबिलातून कोणतीही कपात करण्यात येऊ नये, अशी मागणी खासदार शेट्टी यांनी केली आहे. या बैठकीत तोडगा निघाल्यास साखर आयुक्तालयावर काढण्यात येणाऱ्या आसूड मोर्चाबाबत फे रविचार केला जाईल. मात्र, या बैठकीत फ ारसे काही निष्पन्न होईल, असे वाटत नसल्याचे त्यांनी नमूद केले.

# ‘स्वाभिमानी’च्या आसूडाने फटकारले सरकारला

## पुण्यात महामोर्चाचे आयोजन; पहिली उचल विनाकपात २३५० द्या : राजू शेट्टी

पुणे (प्रतिनिधी) : ऊसदरप्रश्नी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने सोमवारी (ता. १९) जोरदार आसूड मोर्चा काढून राज्य सरकारला चांगलेच फटकारले. साखर कारखान्यांचे धुराडे पेटू न देण्याचा इशारा देतानाच खासदार राजू शेट्टी म्हणाले, ''राज्य सरकारच्या मंत्री समितीने उसासाठी पहिली उचल १३७५ रुपये जाहीर केली, ती आम्हाला मुळीच मान्य नाही, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पहिला हप्ता विनाकपात २३५० रुपये मिळालाच पाहिजे आणि २७००च्या खाली दर स्वीकारला जाणार नाही.''

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी पुण्यातील साखर संकुलवर राज्यातील शेतकऱ्यांचा 'आसूड मोर्चा' काढण्यात आला होता. महात्मा फुले वाड्यापासून प्रारंभ झालेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित शेतकऱ्यांनी राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणा दिल्या. शेतकऱ्यांनी आसूड ओडल्याशिवाय सरकारचे डोके ठिकाणावर येणार नाही, अशा प्रतिक्रिया अनेक शेतकऱ्यांनी या वेळी बोलताना व्यक्त केल्या.

आसूड मोर्चासमोर बोलताना खासदार शेट्टी यांनी सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांवर जोरदार टीकास्त्र सोडले. ते म्हणाले, ''राज्य सरकारच्या मंत्री समितीने पहिली उचल १३७५ रुपये जाहीर केली आहे; मात्र आम्हाला ती मान्य नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पहिली उचल विनाकपात २३५० रुपये मिळाली पाहिजे, ही आमची प्रमुख मागणी आहे. साखर, कापूस, कांद्याच्या निर्यातीवर बंदी घालणारे केंद्र सरकारही शेतकऱ्यांच्या विरोधात आहे. केंद्र आणि राज्य सरकार

### ‘एकच गट्टी..., राजू शेट्टी’

आसूड मोर्चात अनेक शेतकऱ्यांच्या हातात चाबूक होता. चाबकाचा आवाज कसा असतो. आसूड कसा ओढला जा-तो याचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांनी करून दाखविले. प्रत्येकाच्या डोक्यावर गांधी टोपी होती. या टोपीच्या एका बाजूला ‘स्वाभिमानी शेतकरी संघटना’, तर दुसऱ्या बाजूला ‘एकच गट्टी, राजू शेट्टी’ असे लिहिले होते.

पोलिसांना थेट आव्हान...

पुणे जिल्ह्यात मावळ येथे शेतकऱ्यांवर गोळीबार करणाऱ्या पोलिसांनाही खासदार शेट्टी यांनी आपल्या भाषणात आव्हान दिले. ते म्हणाले, की पाण्याचा हक्क मागणाऱ्या शेतकऱ्यांवर राज्य सरकारचे पोलिस गोळीबार करतात.

निरपराध शेतकऱ्यांचा बळी घेणाऱ्या पोलिसांना आमचे आव्हान आहे. ज्या तीन शेतकऱ्यांचे पाण्यासाठी रक्त सांडले आहे, ते आम्ही कदापि विसरणार नाही. रक्ताच्या प्रत्येक थेंबाचा हिशेब आम्ही मांडणार आहोत. शेतकऱ्यांबरोबर लढाई करायची असेल तर पोलिसांनीच तारीख ठरवावी. आम्ही तुमच्याशी सामना करायला तयार आहोत. पोलिसांनी बळिराजावर हात उगारण्याचा प्रयत्न केल्यास आम्हीही आसूड ओढल्याशिवाय गप्प बसणार नाही, असा इशाराही त्यांनी शेवटी दिला.


### साखर आयुक्तालयाला घेराव

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रतिनिधींनी सोमवारी (ता. १९) साखर आयुक्त विजय सिंघल यांना ऊसदरप्रश्नी निवेदन दिले, तसेच मागण्या मान्य होईपर्यंत साखर आयुक्तालयासमोरून न उठण्याचा, तसेच उसाच्या कांड्यालाही हात न लावू देण्याचा इशारा दिला. याप्रसंगी खासदार राजू शेट्टी यांच्यासह संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत, विद्यमान प्रदेशाध्यक्ष दशरथ सावंत, युवा शाखेचे प्रदेशाध्यक्ष रविकांत तुपकर, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष भगवान काटे, मराठवाडा विभागाचे अध्यक्ष सत्तार पटेल, माजी आमदार बाबूराव पाचर्णे आदी उपस्थित होते.

### ‘स्वाभिमानी’च्या मागण्या

- २००९-१० आणि २०१०-११ या दोन्ही हंगामांसाठी अंतिम दर २७०० रुपये प्रति टन देण्यात यावा.
- ऊसबिलातून होणारी कपात मान्य नाही, कपात करू नये.
- महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने ‘एफ आरपी’पेक्षा जास्त दर देणाऱ्या कारखान्यांना कर्ज न देण्याचा निर्णय घेतला आहे, तो त्वरित मागे घेण्यात यावा.
- कृषी मूल्य आयोगाने काढलेला उसाचा हेक्टरी उत्पादन खर्च हास्यास्पद आहे. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या आधारित दर देऊन स्वामिनाथन समितीच्या शिफारशी त्वरित अमलात आणाव्यात.
- शासनाने त्वरित १५ लाख टन साखरेची निर्यात करावी. २०११-१२ साठी पहिली उचल विनाकपात २३५० रुपये द्यावी, त्याशिवाय उसाच्या कांड्याला हात लावू देणार नाही.





# स्वाभिमानी ॲग्रो सर्वसाधारण सभा उत्साहात

जयसिंगपूर : स्वाभिमानी ॲग्रो प्रोडक्टस् प्रोड्यूसर कंपनी ची ५ वी वाषिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पड़ली. यावेळी मार्गदर्शन करताना खासदार राजू श'ट्टी म्हणाले, संस्थेने सर्वांच्या सहकार्याने अल्पावधीतच विकास केला आहे. ज्या उद्देशासाठी आम्ही ही संस्था स्थापन केली होती. तो उद्देश पूर्ण होताना दिसत आहे. अल्पावधीतीच नावारूपाला येऊन मार्केटमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. कंपनीच्या या दोन वर्षात झा–लेली प्रगती ही नेत्रदिपक असून यासाठी मा. खासदारसाहेब यांचे मोलाचे योगदान आहे. सर्व संचालक मंडळ, कंपनीचे सभासद, दुध संकलन करणारे कार्यकर्ते , संस्थाचालक, दुध उत्पादक, वहातुक ठेकेदार व कंपनीतील सेवक वर्ग या सर्वाच्या योगदानाने कंपनी प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

संस्थेची माहिती पुढीलप्रमाणे

सभासद व भाग भांडवल :–

कंपनीचे दि. ३१/०३/२०११ अखेर पुर्ण शेअर्स रक्कम भरलेल्या सभासदांची संख्या ४२६ असून त्यांच्या कडून जमा असलेली शेअर्स रक्कम रु. १ कोटी २९ लाख २६ हजार इतकी आहे. तसेच अद्याप पुर्ण रक्कम न भरलेल्या व्यक्तींची संख्या १०१ असून त्यांच्याकडून शेअर अनामत रक्कम म्हणून रु. ९ लाख २२ हजार ५०० इतकी रक्कम जमा आहे. एकूण भाग भांडवल कंपनीकडे रक्कम रु. १ कोट ३८ लाख ४८ हजार ५०० इतकी आहे. ज्या कार्यकर्त्यांची रक्कम अपूर्ण आहे त्यांनी कृपया उर्वरित रक्कम भरून सहकार्य करावे.

कंपनीने स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा जयसिंगपूर कडून एकूण १ कोटी ६५ लाख टर्म लोन व २७ लाखाची कॅश क्रेडीट असे एकूण १ कोटी ९२ लाखाच्या कर्जाची उचल केली होती. या १ कोटी ९२ लाखापैकी दि. ३१/०३/२०११ अखेर रु. १ कोटी १७ लाखाची कर्ज शिल्लक असून कर्जाचे सर्व हप्ते व व्याजाची रक्कम वेळेवर भरणा केली जाते. सन २०१०–११ या आर्थिक वर्षात रु. ६५ लाख ६१ हजार इतकी रक्कम कर्जास जमा करण्यात आलेली आहे. त्यापैकी रक्कम रू. १८ लाख १८ हजार ९७६ इतकी व्याजाची रक्कम आहे. केंद्र सरकार कडून कंपनीसाठी ५० लाख अनुदान मिळाले असून ते बँकेच्या सबसिडी रिझर्व्ह खातेमध्ये जमा आहेत. परिते चिलींग प्लॅन्टसाठी टर्म लोन रु. ५५ लाख व सीसी २५ लाख मंजूर झाले असून त्याची उचल दि. २७/०८/२०११ रोजी करण्यात आलेली आहे. त्यासाठी केंद्रसरकार यांचेकडून अनुदान मिळणार असून त्याचा प्रस्ताव दाखल केलेला आहे. जमा सबसिडी वजा जाता कंपनीचे टर्म लोन दि. ३१/०८/२०११ अखेर कंपनीचे नावावर असलेले कर्ज रक्कम रू. १ कोटी ५७ लाख ४० हजार ९०२ इतकी आहे. सबसिडी रक्कम वजा जाता देय रक्कम १ कोटी ०७ लाख इतके रहाते. तसेच डेअरीची क्षमता वाढविण्यासाठी १ कोटी ९५ लाख खर्च अपेक्षित असून त्यासाठी १ कोटी ५० लाख कर्ज मागणी प्रस्तावाचे काम सुरू आहे.

ठेवी :

कंपनी ॲक्टप्रमाणे सभासदांकडून ठेवी स्विकारण्यास परवाणगी असल्या कारणाने कंपनीने सभासदांकडून काही रक्कम ९ % प्रमाणे ठेवी स्विकारण्यात आल्या आहेत. कंपनीकडे

पान १५ वर ▶

# स्वाभिमानी ॲग्रो सर्वसाधारण सभा उत्साहात

▸ पान १५ वरून

दि. ३१/०३/२०११ अखेर एकूण ९६ लाख ६५ हजार रक्कमेच्या ठेवी आहेत. ठेवीचा वापर दुध संकलन करणाऱ्या संकलन सेंटरना ॲडव्हान्ससाठी करण्यात आला आहे. ॲडव्हान्सवरही ९ % प्रमाणे व्याज आकारणी केली जाते. दि. ३१/०३/२०११ अखेरचे मुदत ठेवीवरील व्याज रक्कम रु. ६ लाख ५२ हजार २८९ इतके खर्ची पडले आहे. दुध वाढीच्या दृष्टीने या धोरणांचा वापर करण्यात आला असून त्याचा उपयोग चांगल्या पध्दतीने झाला आहे. कंपनीचे दुध संकलन वाढण्यासाठी व दुध उत्पादकांचे गरजा भाविण्यासाठी संकलन सेंटरच्या मागणीनुसार कंपनीच्या शिल्लक रक्कमेतून व जमा झालेल्या ठेव रक्कमेतून ॲडव्हान्स वाटप करण्यात आले आहे. दि. ३१/०३/२०११ अखेरचे ॲडव्हान्स येणे रक्कम रु. १ कोटी ५२ लाख ९९ हजार १४३ इतके असून या सर्व रक्कमेवर ९ % प्रमाणे व्याज आकारणी केली आहे. या आर्थिक वर्षात ८ लाख ५६४ इतके ॲडव्हान्स वरील व्याज झा-लेले आहे. ॲडव्हान्सची वसूली दरदहा दिवसांच्या दुध बिलातून नियमितपणे सुरू आहे. ॲडव्हान्स वाटपामुळे दुध संकलनामध्ये चांगली वाढ झाली आहे.

कंपनीला शिरोळ, हातकणंगले , मिरज, वाळवा, पलूस या तालुक्यातून व कर्नाटक सीमाभागातील काही गांवामधून २५० संकलन सेंटरच्या माध्यमातून दुध संकलन होत आहे. तसेच या आर्थिक वर्षात सुरू करण्यात आलेल्या परिते येथील १० हजार लिटर क्षमतेच्या चिलींग प्लॅन्ट साठी राधानगरी, भुदरगड, करवीर, कागल व पन्हाळा या तालुक्यातून दुध संकलन सुरू असून त्या ठिकाणी १०० संकलन सेंटर कार्यरत आहेत. सन २०१०-११ या आर्थिक वर्षात झालेल्या दुध संकलन व त्याची रक्कम पुढील प्रमाणे

गाय दुध लिटर : ५३ लाख ५९ हजार ४८६ लिटर

म्हैस दुध लिटर : ४९ लाख ८२ हजार ८०९ लिटर

असे एकूण लिटर : १ कोटी ०२ लाख ५८ हजार ५२८ लिटर

सरासरी प्रतिदिन : २८ हजार १०५ लिटर

सदर दुध खरेदीसाठी २० कोटी ६९ लाख ३४ हजार ९५९ इतकी रक्कम अदा करण्यात आली असून दिवाळीसाठी फरक बील म्हणून १ कोटी ११ लाख ६ हजार ६५५ इतकी रक्कम तरतूद करण्यात आ-लेली आहे. सर्व दुध बिले संकलन सेंटरना वेळेवर अदा करण्यात आलेली आहेत. सेंटरना नियमाप्रमाणे ३, १३ व २३ तारखेला दुध बील जमा करायचे असते परंतू दुध संकलन सेंटरना पर्यायाने दुध उत्पादकांना लवकर दुध बीले मिळावीत म्हणून शक्यतो १ , ११ व २१ तारखेलाच त्यांच्या बँक खातेवर जमा केली जातात. दुध वाढीसाठी भरत बँक , स्टेट बँकेमार्फत कर्ज पुरवठा करण्यात आलेला आहे.

कंपनीच्या वतीने पहिल्या दिवसाचे व पहिल्या धारेचे चिक संकलन केले जात असून त्यास प्रति लिटरला रु. ५०/- दर दिला जातो. सदर चिकाला पुणेमध्ये चांगली मागणी असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

दुध विक्री :

कंपनी स्वत:च्या स्वाभिमानी ब्रॅण्डने दुधाची विक्री करीत असून मार्केटमध्ये चांगला प्रतिसाद मिळत आहे. सध्या आपले दुध पॅकींगमध्ये बेळगांव, विजापूर, पुणे, मिरज, जयसिंगपूर, सांगली, आष्टा, इचलकरंजी व त्या मार्गावरील गांवामध्ये विक्री सुरू आहे. तसेच बल्कमध्ये टँकरम धून मुंबई, गोवा व अमूल डेअरी गुजरात यांना पाठविण्यात येते. त्यालाही चांगली दर मिळत आहे. या आर्थिक वर्षात पॅकींग दुध विक्रीतून रक्कम रू. ७ कोटी ९९ लाख ४९ हजार ९४८ इतके जमा झालेली आहे. बल्क दुध विक्री मधून रक्कम रू. १६ कोटी २३ लाख ५१ हजार ५६ इतके जमा झा-लेला आहे असे एकूण रक्कम रू. २४ कोटी २३ लाख १ हजार ४ दुध विक्री पासून जमा झालेली आहे.

कंपनीच्या वतीने दुग्धजन्य पदार्थ तयार केले जात असून यामध्ये लस्सी, मसाला ताक, दही, आम्रखंड , श्रीखंड, चक्का, पनीर, बासुंदी, खवा इत्यादी दुग्धजन्यपदार्थाचे उत्पादन सुरू करण्यात आले आहेत. पुढील काळात लवकरच टेबल

पान १७ वर ▸

# स्वाभिमानी ॲग्रो सर्वसाधारण सभा उत्साहात

▶ पान १६वरून

बटर, चीज व मिल्क पावडर तसेच काही कंपनीच्या बरोबर चर्चा करून चॉकलेट बनविण्याचा विचार आहे. आज मार्केटमध्ये स्वाभिमानी प्रोडक्टस्‌चे चांगले नांव झाले आहे. लग्न समारंभ, वास्तूशांती अशा घरगुत्ती कार्यक्रमासाठी आपल्या प्रोडक्टचा वापर केला जात आहे. आर्थिक वर्षात दुग्ध जन्य पदार्थ विक्रीतून ६४ लाख ३७ हजार ३२४ इतकी रक्कम जमा झालेली आहे. ह्या सर्व विक्रीसाठी कोणत्याही प्रकारची जाहिरात न करता फक्त माऊथ पब्लिसिटी व खासदारसाहेब आणि स्वाभिमानी शेतकरी संघटना यांच्या नावावर मार्केटमध्ये चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## पशुखाद्य खरेदी व विक्री :

दुध उत्पादकांना स्वस्त दरात सरकी पेंड व पशुखाद्य मिळावे यासाठी सरकी पेंड व गोदरजचे पशुखाद्य खरेदी करून ते संकलन सेंटरना विक्री साठी माफक दरात दिले जाते. त्यामुळे दुध उत्पादकांनाही चांगल्या प्रतीचे पशुखाद्य माफक दरात उपलब्ध होण्यास मदत होत आहे. या आर्थिक वर्षात एकूण पशुखाद्य खरेदीसाठी रक्कम रू. १ कोटी २८ लाख ५१ हजार २६१ इतका खर्च झालेला असून ती विक्री करून त्यापासून रक्कम रू. १ कोटी ३४ लाख ७ हजार १२८ इतकी जमा झालेली आहे. यापुढे कंपनी स्वत:च्या नांवाने स्वाभिमानी या ब्रॅण्डने खाद्य उत्पादन करणार आहे.

सन २०१० –११ या आर्थिक वर्षात नविन खरेदी केलेल्या मशिनरीसाठी रक्कम रू. ४८ लाख १३० रक्कमेची गुंतवणूक झालेली आहे. यामध्ये दुध साठविण्यासाठी २०००० लि.चे दोन सायलो टँकी, पॅकींग मशिन , डीप फ्रिजर, याचा समावेश आहे. तसेच इमारत बांधकाम कामासाठी १३ लाख ६९ हजार ५४२ रक्कमेची गुंतवणूक केली असून यामध्ये गोडावून बांधकाम, कॅन्टीन बांधकाम परिते चिलींग प्लॅन्ट यांचा समावेश आहे.

## पशुवैद्यकिय सेवा :

कंपनीच्या वतीने दि. १५/०८/२०११ पासून पशुवैद्यकिय सेवा सुरू करण्यात आली आहे. यासाठी पशुवैद्यकिय अधिकारी म्हणून डॉ. जितेंद्र लेंभे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. व त्यांच्या हाताखाली ७ एल.एस.एस. झालेले पशुवैद्यकिय पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे इतर संघाप्रमाणे आ–पणालाही वाजवी दरात दुध उत्पादकांना पशुवैद्यकिय सेवा देणेचे सोयीचे झाले आहे. कृत्रिम रेतन, ऑपरेशन्स व नियमित उपचार आणि रोग प्रतिबंधक लसींचे उपचार सुरू केले आहेत.

## नफा – तोटा :

कंपनीच्या ताळेबंदनुसार कंपनीला चालू आर्थिक वर्षात घसारा ३२ लाख व दुध उत्पादक बोनस रक्कम रू. १ कोटी ११ लाख वजा जाता २३ लाख ७३ हजार ४७७ इतका नफा झालेला आहे. मागील आर्थिक वर्षातील कंपनीकडील संचित तोटा २७ लाख ५० हजार ७०० इतका असून ते वजा जाता अद्याप कंपनी दि. ३१/०३/२०११ अखेर ३ लाख ७७ हजार २५३ इतका संचित तोटा आहे. चालू आर्थिक वर्षात संचित तोटा वजा होवून कंपनी चांगल्या नफ्यात येईल अशी अपेक्षा आहे. दि. ०१/०४/२०११ ते ३१/०८/२०११ या चालू ५ महिन्यात कंपनीला रु. ५२ लाख ५५ हजार नफा झालेला आहे. यावेळी सर्वात जास्त दूध घालणाऱ्या ६ संस्थांच्या खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते सदाभाऊ खोत, जिल्हाध्यक्ष भगवान काटे, पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. जालंधर पाटील, उपाध्यक्ष उल्हास पाटील, कार्यकारी संचालक डॉ, सुभाष अड्‌दंडे, सावकर मादनाईक, अण्णासो चौगुले, आदिनाथ हेमगिरे, रामचंद्र फुलारे, दशरथ घाटगे, विपिन खाडे, सागर मगदूम, पै. विठ्ठल मोरे, सागर संभूशेटे आदी उपस्थित होते.

# जमिनीचा सुपिकपणा टिकवण्यासाठी

# हिरवळीची खते वापरा

पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५

शेतकरी दिवसेंदिवस नगदी पिकांचे उत्पादन जास्तीत जास्त कसे काढता येईल याच्या पाठीमागे सर्वांचे उद्दीष्ट असल्याने जमिनीवर त्याचा वाईट परिणाम काय होतो याकडे लक्ष दिले जात नाही. मागील २५ – ३० वर्षामध्ये अनेक पिकांमध्ये नवीन जाती शोधून काढल्या गेल्या. त्या जातींना भरपूर रासायनिक खते, पाणी व पीक संरक्षण देऊन उत्पादनात भरघोस वाढ झाली. पण रासायनिक खते वापरून सुध्दा काही जातींना अपेक्षित वाढ मिळालेली नाही. कारण म्हणजे शेत जमिनीचा सकसपणा कमी होऊन जमिनीची उत्पादन क्षमता घटत चालली आहे. वरील बाबीला उपाय म्हणजे जमिनीचा कस निरनिराळ्या सेंद्रिय खतांच्या वापराने वाढवून जमिनीची उत्पादकता कायम ठेवणे जरूरीचे आहे. या सेंद्रिय खतामधील एक प्रमुख खत म्हणजे हिरवळीचे खत होय. हिरवळीच्या खतामुळे रासायनिक खताचे प्रमाण कमी करता येते. व त्यामुळे खर्चात बचत होऊन जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे योग्य ते प्रमाण राखता येऊन तिचा सुपिकपणा टिकवता येतो.

हिरवळीची खते म्हणजे शेतात मुख्यत्वे व्दिदल शेंगवर्गीय पिकांची वाढ करून जमिनीत गाडावयाची. त्यांचे विघटन होऊन जमिनीत सेंद्रिय पदार्थ व नत्र, स्फुरद यांचे प्रमाण वाढून ते नंतरच्या पिकाला जास्त उपयोग पडते. यासाठी ताग, धेंचा, मूग, चवळी यांचा उपयोग करतात. अलिकडे सिस्बेनिया रोस्ट्रार स्लरिलिडीया, सुबाभुळ यासारख्या वनस्पतींची पाने हिरवळीचे खत म्हणून वापर करता येतो. हे सर्व जमिनीत गाडल्यानंतर ४ ते ६ आठवड्यांत सर्व पानांचे विघटन होऊन जमिनीत नत्र व सेंद्रिय पदार्थांमध्ये वाढ झालेली आढळते.

(अ) खालील वनस्पती हिरवळीच्या खतासाठी वापरलेली जातात :

१) धेंचा : याचा हिरवळीचे खत म्हणून चांगला उपयोग होतो. यांच्या मुळावर गाठी असल्यामुळे त्यात नत्राचा साठा असतो. याचा हेक्टरी १५ ते २० टन ओले सेंद्रिय पदार्थ उपलब्ध होतात. धेंचा हेक्टरी २० ते २५ किलो बी पेरून ते ४५ ते ५० दिवसात जमिनीत गाडावेत.

२) ताग : ताग हे महत्वाचे हिरवळीचे खत आहे आणि पेरणीसाठी हेक्टरी २५ ते ३० किलो बी वापरून ४५ ते ६० गाडावेत. त्यांच्या पासून हेक्टरी १२ ते २० टन ओले सेंद्रिय पदार्थ मिळते.

३) मूग, उडीद व चवळी : मुगाचे , उडीदाचे किंवा चवळीचे उत्पादन घेऊन कापणीनंतर त्याचे अवशेष शेतातच गाडले असता त्यापासून ५० ते ५५ किलो हेक्टरी नत्र पिकाला उपलब्ध होते. मूग, उडिद व चवळी या धान्याचे उत्पन्न घेऊन त्याचा अवशेष शेतात गाडल्यामुळे नत्र उपलब्ध होऊन जमिनीच्या घडणवरही चांगला परिणाम होतो.

पान ७ वर ▶

# जमिनीचा सुपिकपणा टिकवण्यासाठी हिरवळीची खते वापरा

▶ पान ५ वरून

४) ग्लिरिसिडीया (गिरीपुष्प) सुबाभुळ – या झाडांचे पोण हिरवळी खतासाठी वापरले जातात.

ब) जमिनीत हिरवळीच्या पिकाचे विघटनः जमिनीत पुरेसा ओलावा असतना हिरवळीची पिके जमिनीत गाडली असता त्यांचे विघटन लवकर होते. हिरवळीचे पिकामध्ये नत्र, पाण्यात विरघळणारी इतर अन्न द्रव्ये यांचे प्रमाण बरेच असून सेल्युलोज व लिगनिन यांचे प्रमाण कमी असते. म्हणून त्यांचे विघटन लवकर होते. जर हिरवळीचे पीक पुरेसे वाढवून मग गाडले तर यामुळे विघटन सावकाश होते. हिरवळीच्या खतासाठी ज्यावेळी शेंगवर्गीय व्दिदल पिकाची निवड केली जाते. ज्यावेळी पेरायचे आधी पिकाला रायझोबिया जीवाणू खताचा वापर करावा. त्यामुळे झाडांची वाढ चांगली होऊन त्यांच्या मुळावर गाठीची संख्या वाढते. असले पिक जमिनीत गाडली असता जमिनीत पुरेसे नत्र उपलब्ध होते. शेंगवर्गीय व्दिदल पिकाला रायझोबीयम जीवाणू खत बरोबर स्फुरद दिले असता. ओल्या सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढते. धेंच्या या ताग पिकांना बोनमिल किंवा सिंगल सुपर फॉस्फेट दिले असता त्यापासून ओल्या सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढते. स्फुरद घातल्याने या पिकांच्या मुळावरील गाठींची संख्या वाढते. तसेच पाण्यात विरघळणाऱ्या स्फुरदची उपलब्धता वाढून नंतर घातलेल्या पिकाला त्याचा उपयोग होतो. हिरवळीची खते नेहमी शेतकरी घेण्यास टाळाटाळ करतात. कारण हिरवळीचे पिकत पेरून ६ ते ८ आठवड्यात जमिनीत गाडून टाकल्याने त्याला लगेच आर्थिक फायदा होत नाही. सर्व शेतकरी लक्षात ठेवा हिरवळीची खते वापरल्याने उत्पादनात जास्त वाढ होतेच त्याच बरोबर जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे योग्य ते प्रमाण राखता येऊन तिचा सुपिकपणा टिकवता येतो. तसेच हिरवळी खतामुळे रासायनिक खतांचे प्रमाण कमी करता येते. व त्यामुळे खर्चात बचत होते.

# राज्यात विक्रमी ३४ लाख टन साखर शिल्लक

पुणे : यंदाचा गळीत हंगाम तोंडावर आला असतानाच देशात तब्बल ५७ लाख मेट्रिक टन साखर शिल्लक असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यापैकी राज्यात विक्रमी ३४ लाख टन साखर शिल्लक आहे, त्यामुळे आणखी १५ लाख मेट्रिक टन साखर निर्यातीस परवानगी देण्याची मागणी करण्यात येत आहे.

उसाची उपलब्धता विचारात घेता, यंदा एक ऑक्टोबरपासूनच गळीत हंगाम सुरू करण्याचे नियोजन साखर संघामार्फ त करण्यात येत आहे. त्यासाठी आ–तापासूनच शेतकरी संघटना आणि ऊसतोड कामगार संघटनांच्या प्रतिनिधींबरोबर राज्य सरकारने बोलणी सुरू केली आहे. यंदा देशात उच्चांकी साखर उत्पादन झाल्यामुळे गोदामे ओसंडून वाहत आहेत. उत्तर प्रदेशात ८.८३ लाख मेट्रिक टन, गुजरातमध्ये १२.५ लाख मेट्रिक टन; तर कर्नाटकात ३६.१६ लाख मेट्रिक टन साखरेचे उत्पादन झाले. एकट्या राज्यात ९०.७२ लाख मेट्रिक टन साखरेचे उत्पादन झाले. आजवर केंद्र सरकारने निर्यातीस परवानगी दिलेल्या साडेचौदा लाख मेट्रिक टनापैकी ५.४ लाख मेट्रिक टनाचा कोटा राज्याच्या वाट्याला आला; परंतु अद्यापही राज्यात ३४ लाख मेट्रिक टन साखर शिल्लक असल्यामुळे आणि २०११–१२ चा गळीत हंगाम तोंडावर आल्यामुळे शिल्लक साखरेच्या साठ्यात भरच पडणार आहे. उसाचा दुसरा हप्ता देण्याची पंचाईत झालेल्या साखर कारखान्यांची गोदामे मात्र साखरेने ओसंडून वाहत आहेत.